# यशवंतराव चव्हाण आणि पंचायतराज व्यवस्था

संपादक
डॉ. राजेश करपे । डॉ. गणेश मोहिते



ISSN: 2455-6211
Valume 10, Issue 3,
March- 2022,
Impact Factor : 7.429

Scanned with CamScanner

# International Journal of All Research Education & Scientific Methods

An ISO Certified Peer-Reviewed Journal
ISSN: 2455-6211

IMPACT FACTOR: 7.429

**One Day National Conference on Yashwantrao Chavan and Panchayat Raj System," held on 26th March, 2022 was organized by LokSanwad Foundation Aurangabad, Maharashtra.**

Scanned with CamScanner

International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Valume 10, Issue 3, March- 2022, Impact Factor : 7.429, Available online at : www.ijaresm.com

# ... अनुक्रम ...


६८) सौ. सुजाता सचिन देशमुख, श्रीमंत बाबासाहेब देशमुख — २६५
६९) डॉ. माया वानखेडे — २७१
७०) राहुल शिवाजी तिगोटे, प्रा. डॉ. दीपक भुसारे — २७४
७१) डॉ. एस. एस. बिरंगणे — २७७
७२) डॉ. महेश विनायक रोटे — २८०
७३) योगेश बाबासाहेब कवडे — २८३
७४) प्रा. डॉ. संपदा कुलकर्णी — २८७
७५) महेशकुमार एकनाथ जाधव — २९०
७६) गोरे ज्ञानेश्वर प्रभाकर, प्रा. डॉ. दीपक भुसारे — २९५
77) Dr. Vivekanand Laxman Chavhan — 300
७८) प्रा. शिवराम सेगजी वसावे — ३०५
७९) उमेश कमलाकर नवल — ३११
८०) डॉ. संध्या मोहिते — ३१६
८१) अश्विनी शिवदास माने — ३२०
८२) डॉ. आर. बी. म्हस्के, डॉ. बी. के. झिरपे — ३२१
८३) प्रांजली रमेश खबाले — ३२६
८४) प्रा. डॉ. के. जी. पोकळे, गणेश रामराव कदम — ३३०
85) Dr. Madrewar S. G., Dr. Marwadi R. E. — 334
८६) प्रा. डॉ. सुनीता सिनगारे — ३३७
८७) प्रा. शिवराम सेगजी वसावे — ३४६
८८) डॉ. विठ्ठल रामकिशन भोसले — ३५२
८९) भावसार तन्मय प्रभाकर, डॉ. कावळे बंडु नानाभाऊ — ३५७
९०) प्रा. डॉ. नरवाडे जे. एम. — ३६१
९१) वैशाली प्रकाश पवार — ३६५
९२) डॉ. गिरे संजय भाऊराव — ३६८
९३) डॉ. प्रशांत एन. देशमुख — ३७०
९४) प्रा. अहिरे विलास सांडूजी, डॉ. रमाकांत एन. तिडके — ३७४
९५) प्रा. डॉ. मधुकर रामचंद्र साठे — ३७८
९६) डॉ. उमाकांत सुभाष गायकवाड — ३८१
९७) डॉ. मोरे अर्जुन मोहनराव — ३८५
९८) प्रा. डॉ. भानुसे कारभारी लक्ष्मण — ३८९
९९) डॉ. लोमटे आर. व्ही., दळवे बालाजी भाऊसाहेब — ३९२
१००) डॉ. ए. बी. मुळीक — ३९६
101) Miss. Kambale Kusum Shivaji, Dr. N. B. Aghav — 402
१०२) डॉ. विठ्ठल केदारी — ४०६
१०३) प्रा. राम गोविंद दळवे — ४०८
१०४) डॉ. म्हस्के अमोल — ४१२
१०५) डॉ. इंगळे चत्रभूज बंकटराव — ४१५
१०६) प्रो. डॉ. गंगणे आर. व्ही. — ४१९
१०७) डॉ. मोराळे सुहास रंगनाथ, गीता शंकर गाडेकर — ४२३
१०८) कु. सुशीला असाराम शेजवळ, कु. छाया अनिल वाकोडे, प्रा. डॉ. सय्यदा रुक्साना तब्बस्सुम — ४२६
१०९) डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले — ४२९
११०) डॉ. गोंदकर तुकाराम दत्तात्रय — ४३३
१११) डॉ. चत्रभुज नारायणराव सोळंके — ४३७
११२) टिपू सुलतान सय्यद नूर सय्यद, योगेश बाबासाहेब कवडे — ४४०
113) Ms. Sanase Archana, Dr. Govardhan Aute — 446
११४) डॉ. मधुकर बैकरे — ४४९
११५) डॉ. कैलास सोनू महाले — ४५३
११६) डॉ. देशमुख एम. वी. — ४५९
११७) गरुड काकासाहेब लक्ष्मण, डॉ. जिगे डी. एन. — ४६३
११८) डॉ. बी. एन. कावळे, अमोल शशीकांत भोसले — ४६७
११९) गणेश पुनमचंद विरूटे, प्रा. डॉ. सुवर्णा पाटील — ४७०
१२०) प्रा. डॉ. शिंदे शाम भागवत — ४७३
१२१) डॉ. सुजाता करांडे — ४७६
१२२) प्रा. डॉ. रामहरी मायकर — ४८४
१२३) प्रा. डॉ. पवार आर. एस. — ४८७
124) Kishor Ganesh Gorde, Yogesh Dnyaneshwar Shinde — 491
१२५) श्री. दत्तात्रय विश्वंभर जाधव, प्रा. डॉ. आर. बी. वनारसे — ४९३
१२६) प्रा. डॉ. दीपक सुभाष वाघमारे — ५००
१२७) डॉ. राजेंद्र साहेबराव धाये, गोधाजी सोपानराव कापसे — ५०४
१२८) प्रा. डॉ. पांडुरंग माणिकराव नवल — ५०७
१२९) जयश्री साहेबराव बनसोड — ५११
१३०) प्रा. डॉ. पंडित रानमाळ — ५१४
१३२) डॉ. श्याम पुंजाराम पवार, मुरलीधर संपतराव राठोड — ५१७
133) Dr. Fulchand Salampure — 521
१३४) निलेश शशिकांत खिल्लारे, आश्रू पांडूरंग मोरे — ५२५

International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March- 2022, Impact Factor : 7.429, Available online at : www.ijaresm.com

# यशवंतराव चव्हाणयांचा वाङमयीन दृष्टीकोन

डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

****************

## प्रस्तावना

महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्या राजकारणात आपले वेगळेपण सांभाळून अनेक महत्वाच्या भूमिका पार पाडलेले यशवंतराव चव्हाण हे असामान्य नेते होते.महाराष्ट्राच्या राजकारणात तर त्यांचे नाव आजही अतिशय आदराने आणि तितक्याच कृतज्ञतेने घेतले जाते.त्याचे कारण म्हणजे यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तीमत्वात असलेले सुसंस्कारीपण. यशवंतरावांनी ग्रामीण महाराष्ट्राला आधुनिक महाराष्ट्र अशी ओळख निर्माण करून दिली. आजपर्यंत त्यांच्या राजकीय कारकिर्दीचे मूल्यमापन अनेकांनी वेगवेगळ्या पद्धतीने केले आहे. मात्र प्रस्तुत लेखात यशवंतराव चव्हाण साहित्यिक असूनही, राज्यकर्ते कसे झाले?या संदर्भानेकरत असताना ते राज्यकर्ते असूनही त्यांच्या साहित्यिक जडणघडणी च्या संदर्भाने त्यांच्या वाङमयीन दृष्टीकोनाचाविचार केलेला आहे. ते वाचकांनी प्रथम समजून घ्यावे.

आपल्या बोलण्या वागण्यावर,विचार करण्यावर,व्यक्तिमत्वावर, कळत नकळत आपल्या कुटुंबाचा,भौगोलिक सामाजिक, सांस्कृतिक,सांप्रदायिक पर्यावरणाचा व परिस्थितीचा परिणाम होत असतो. उदाहरणच द्यायचे झाले तर शेतकऱ्यांच्या, वारकऱ्यांच्या घरात मुलांवर शेतीचे व अध्यात्माचे संस्कार होतात त्याला शेतीच्या सर्व अवजाराची, शेतीतील पिकांची त्यासाठी कराव्या लागणाऱ्या मशागतीची माहिती आपोआप होते.तशी माहिती एखाद्या खेळाडूच्या घरी खेळाची माहिती त्याच्या मुलांना उपलब्ध होत असते.किंवा राज्यकर्त्यांच्या घरी त्यांच्या मुलांना अनौपचारिक राजकारणाचे धडे प्रत्यक्षात पाहायला आणि शिकायला मिळतात. परंतु महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री तथा आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार असलेलेल्या आणि देशाचे संरक्षण मंत्री असलेल्या स्मृतीशेष यशवंतराव चव्हाण यांच्या बाबतीत अगदी असेच झाले असे म्हणता येत नाही. कारण ग्रामीण भागातल्या शेतकरी कुटुंबाचे घर तसे वाड्मयीन संस्काराच्या दृष्टीने एकूण प्रतिकूलच असते. पण यशवंतराव चव्हाण यांनी सर्व प्रकारच्या परिस्थितीवर मात केली. त्यांना वाड्मयीन प्रतिभेचे देणे त्यांच्या वारकरी असलेल्या आईकडून लोक परंपरेने उपजतच मिळाले होते.स्वातंत्र्यपुर्व काळातील कुठल्याही ग्रामीण आईकडून जात्यावर दळतांना मौखिक वाड्मयीन संस्कार आपल्या मुलांवर न कळत होत असत, तसा यशवंतराव चव्हाण यांच्यावरही त्यांच्या आईकडून वाड्मयीन संस्कार झाला. पुढे कळत्या वयात आईच्या बरोबर ऐकलेले कथा-कीर्तने, प्रवचन इत्यादीच्या माध्यमातून यशवंतराव चव्हाण यांचे भाषिक कौशल्य, भाषाभान अधिक सतर्क होत गेले. त्याला कृष्णाकाठच्या सांस्कृतिक भौगोलिक परिसराने आणि परिस्थितीने अधिक समृद्ध बनवले. त्यातूनच यशवंतराव चव्हाण यांच्या मनात सृजनशील उर्मी निर्माण झाली व यशवंतराव चव्हाण साहित्यिक म्हणून सुसंस्कारित होत गेले असे म्हटले, तर ते कदापि चुकीचे होणार नाही.कारण साहित्यिकावर,लेखकावर समाजातील माणसांचा त्यांच्या वृत्ती-प्रवृत्तीचा, राग लोभाचा जसा परिणाम होत असतो,तसा तो ज्या वातावरणात परिसरात राहतो त्याचे ही काही संस्कार ठळकपणे होत असतात.त्यातून लेखक स्वतःचा अवकाश शोधत असतो. यशवंतराव चव्हाणांना' कृष्णाकाठच्या नितांत सुंदर निसर्ग सानिध्यातून आपल्या अवकाश 'ऋणानुबंध' या कलाकृतीत सापडला. म्हणूनच त्यांनी आपली कलाकृती कृष्णा-कोयनेच्या काठावर नांदणाऱ्या कराडला समर्पित करून आपल्या परिसराचा कृतज्ञताभाव व्यक्त केलेला आहे.



Scanned with CamScanner

International Journal of All Research Education and Scientific Methods (IJARESM), ISSN: 2455-6211
Volume 10, Issue 3, March- 2022, Impact Factor : 7.429, Available online at : www.ijaresm.com

यशवंतराव चव्हाण 'ऋणानुबंध च्या अर्पणपत्रिकेत म्हणतात, 'कृष्णा-कोयनेच्या या पाण्याने काही छंद लावले व काही श्रद्धा दिल्या.' यशवंतरावांना भरभरून दिलेल्या या परिसराने अत्यंतिक लळा लावला. त्यामुळेच ऋणानुबंधात ते आपले बालपण शोधताना दिसतात. त्यातले काही प्रसंग पाहण्यासारखे आहेत.

i. सोनहिरा ओढ्याच्या काठावर घनगर्द अंबराईत कोकिळेच्या कुहू कुहू स्वरातसूर मिसळून यशवंतरावांनी अर्धअधिक मेघदूत पाठांतर केले होते.
ii. डोंगरावर एकट्याने चढावे उतरावे, संगमात डुंबावे.
iii. कृष्णा कोयनेचे एकात्म होऊन वाहणारे पाणी पहात काठावर तासंतास चिंतन करावे. हा यशवंतराव यांच्या बालवयातला मुक्त जीवनकर्मच त्यांच्यातल्या साहित्यिकाच्या निकोप जडणघडणीला कारणीभूत ठरला.

यशवंतराव चव्हाण ज्या समकालीन वातावरणात जगत होते. त्या कालखंडावर वाड्मयीन दृष्ट्या फडके खांडेकरांच्या प्रभाव नकळत होता. यासमकालीन वाड्मयीन वातावरणाचा परिणामही यशवंतराव चव्हाण यांच्या संवेदनशील व्यक्तिमत्वावर झाला. तो यशवंतराव चव्हाणांनी स्वतः मान्य केल्याचे नमूद देखील केले आहे. फडके खांडेकर युगाने अनेक तरुणावर जसा परिणाम केला तसा यशवंतरावांवर ही केला ते भारावून गेले व स्वतःला आत्यंतिक आदर्शवादी वगैरे समजून राष्ट्रीय चळवळीत झोकून दिले व तुरुंगवास देखील पत्करला. तुरुंगात असताना तुरुंगातील युवकांचे भावविश्व चितारणारे दीर्घकाव्य लिहिण्यास सुरुवात केली.त्यातील काही भाग त्यावेळी लोकक्रांती नियतकालिकातून प्रकाशितही झाला. तुरुंगात असतानाच कादंबरी वगैरे लिहीण्याचा बेत निश्चित केला.

**राजकारणी आणि साहित्यिक यातील फरक:**

यशवंतराव चव्हाण यांचा साहित्य विषयक दृष्टिकोन समजून घेण्यापूर्वी यशवंतराव चव्हाण यांच्या संदर्भाने 'राजकारणी आणि साहित्यिक' यातील फरक समजून घेऊन त्यांचे मूल्यमापन करणे योग्य ठरेल. समाजाने काही संकल्पना स्वतःहून ठरवून घेतलेल्या असतात. त्यामध्ये राजकारणी माणूस साहित्यिक असू शकत नाही, तसेच साहित्यिक माणूस देखील राजकारणी होऊ शकत नाही. याला कसलाहीशास्त्रीय आधार, तर्क नाही, तरीपण समाज मानसिकता मात्र काही अंशी अशीच असल्याचे जाणवते. त्यामुळे यशवंतराव चव्हाण एक साहित्यिक म्हणून मूल्यमापन करताना त्यांच्यांवर जसा अन्याय होतो.तसा यशवंतराव एक राजकारणी म्हणून मूल्यमापन करताना देखील अन्याय होतो. यशवंतराव चव्हाण यांच्या बाबतीत साहित्य आणि राजकारण सरमिसळ न करता स्वतंत्रपणे मूल्यमापन करणे अत्यंत गरजेचे आहे. तसा प्रयत्न कोणी केला नाही असे नाही. पण प्रस्तुत लेखात यशवंतराव चव्हाण साहित्यिक राज्यकर्ते म्हणून त्यांची इतरांपेक्षा असलेली वेगळी ओळख करून देणे हा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे.

राजकारण व साहित्य या दोघांचेही माध्यमशब्दआहे. म्हणून राजकारणी आणि साहित्यकाराचे शब्दबंद असतात.अशा प्रकारे साहित्यिकांचा गौरव करणारे यशवंतराव चव्हाण आधी ते साहित्यिक लेखक होते, नंतर ते राजकारणी व राज्यकर्ते होते. त्यामुळे राजकारणी व साहित्यिक यातील फरक समजून घेणे फार कठीण नाही.

**यशवंतराव चव्हाण यांचा साहित्यविषयक दृष्टिकोन:**

थोर सत्यशोधक समाजचिंतक,वाड्मय अभ्यासक यशवंतराव चव्हाणयांनी दिनांक २६मार्च, १९७२ रोजी नवी दिल्ली येथे लेखक शिबिराच्या उद्घाटन प्रसंगीच्या भाषणात 'साहित्यिक आणि साहित्य' यांच्याकडून काही अपेक्षा व्यक्त करताना जे मत व्यक्त केले होते, त्यावरून त्यांचा साहित्याकडे व साहित्यिका कडे पाहण्याचा दृष्टिकोन किती मूलग्राही, वस्तुनिष्ठ व्यापक आणि निकोप होता हे लक्षात येते. ते उद्घाटनपर भाषणात म्हणतात,' लेखकांनी अन्याय आणि पक्षपाती परंपराच्या जुन्या बुरूजावर हल्ले चढवले पाहिजेत नव्या उदार कल्पनांचे स्वागत करणारे वातावरण समाजात निर्माण केले पाहिजे आणि न्याय व करुणा यांच्या आधारावर समाजाची रचना होण्याच्या क्रियेला सर्वसामान्यपणे चालना दिली पाहिजे. सृजनशील लेखक विद्यमान सामाजिक व आर्थिक संदर्भा पासून



Scanned with CamScanner

पूर्णतः दूर राहू शकत नाही. सामान्य माणसाच्या जीवनाच्या चित्रणातून लेखक परिवर्तन घडवून आणतील आणि नव्या सामाजिक व आर्थिक संस्थाच्या विकासाला पोषक असा प्रभाव पाडतील.[13]

यशवंतराव चव्हाण यांच्या वरील विवेचनात त्यांचा साहित्यविषयक दृष्टिकोन तर स्पष्टपणे दिसतोच पण यशवंतराव चव्हाण यांची सहित्याविषयीची अपेक्षा एका समाजचिंतकांची अपेक्षा होती हे स्पस्ट होते. जोपर्यंत अन्याय आणि पक्षपाती परंपराच्या जुन्या बुरुजां ना ओळखणार नाहीत तोपर्यंत त्यांच्याकडून परिवर्तनाची अपेक्षाही करता येणार नाही.आणि जोपर्यंत परिवर्तनाचा अंगीकार केला जाणार नाही तोपर्यंत नव्या सामाजिक व आर्थिक संस्थांच्या विकासाला पोषक असे वातावरण ही निर्माण होणार नाही. हे वास्तव साहित्यिक यशवंतराव चव्हाण अतिशय दूरदृष्टीपणाने मांडतात. त्यांच्या या विचारात आधुनिक महाराष्ट्राचा चेहरा कसा असावा याचे स्पष्टपणे केलेले भाकीत होते. यशवंतराव चव्हाण यांच्या उपरोक्त साहित्यविषयक चिंतनातून काही मुद्दे आजही समोर येतातते असे,

१. अन्याय आणि पक्षपाती परंपराचे काही जुने बुरुज आजही भक्कमपणे उभे आहेत.
२. अशा भक्कम बुरुजावर हल्ले चढविले पाहिजेत.
३. असे केले तरच उदार निकोप कल्पनांचे स्वागत करणारे वातावरण समाजात निर्माण होऊ शकते.
४. त्यातूनच न्याय व करुणा यांच्या आधारावर समाजाची रचना होण्याच्या क्रियेला चालना मिळू शकते.
५. असे झाले तरच सामान्य माणसाच्या जीवन चित्रणातून परिवर्तन घडवून आणू शकतील आणि एक व आर्थिक संस्थेच्या विकासाला पोषक असा प्रभाव पडतील.

या वरील मुद्द्यावरून हे स्पष्ट होते की, अन्याय आणि पक्षपाती परंपराच्या बुरुजावर हल्ले चढवून ते नेस्तनाबूत केल्याशिवाय पर्याय नाही. याशिवाय समाजाचा, राष्ट्राचा विकास नाही,परंतू तरीही प्रश्न शिल्लक राहतो तो हा की, अन्यायी आणि पक्षपाती परंपराचे बुरुज कोणते? या प्रश्नांच्या उत्तरासाठी सध्या उपलब्ध असलेला बहुजनांचा साहित्य इतिहास धुंडाळावा लागेल.दुर्दैवाने बहुजनांचा सामाजिक, सांस्कृतिक वाङ्मयीन इतिहास उपलब्ध नाही. जो उपलब्ध आहे, तो खरेच सामाजिक, सांस्कृतिक इतिहास आहे का? याचे उत्तर स्पष्टपणे नकारार्थी येते. मग जर बहुजनांचा सामाजिक, सांस्कृतिक वाङ्मय इतिहासच उपलब्ध नसेल, तर अन्यायी आणि पक्षपाती परंपराचा,यशवंतराव चव्हाण म्हणतात तसा शोध घ्यायचा तरी कसा? आणि तसा शोध लागला नाही तर हल्ले कश्यावर चढवायाचे आणि परिवर्तन कसे घडवायचे.? हे भयावह वास्तव मराठी साहित्याच्या वाङ्मय इतिहासात निर्माण होईल हे यशवंतराव चव्हाण यांना फार पूर्वीच कळाले होते. त्यांची साहित्याची जाणीव फार व्यापक, सखोल व मूलगामी असल्याचे वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

राजर्षी शाहू महाराज, महात्मा जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी महाराष्ट्राला परिवर्तनीय गती देऊन प्रभावी उन्नतीकडे नेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या यशवंतराव चव्हाण यांना हे ठाऊक होते की, साहित्य हे प्रभावी व परिणामकारक शास्त्र आहे. या शस्त्राला धार कशी लावावी याचा वस्तुपाठ वरील अवतरणातून यशवंतराव चव्हाण यांनी घालून दिला असे म्हणता येईल.

## समारोप

यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय कर्तुत्वाच्या अंगाने प्रचंड लेखन,संशोधन झाले आहे. परंतु आजही यशवंतराव चव्हाण साहित्यिक राज्यकर्ते म्हणून त्यांची ओळख ठसठशीतपणे करून देण्याची नितांत आवश्यकता आहे. कारण राजकारणी माणूस जर साहित्यिक असेल, तर तो त्याच्या दुय्यम कर्तृत्वामुळेच अधिक प्रसिद्धीला येतो. त्यामुळे यशवंतराव चव्हाण यांचा मूळ पिंड संवेदनशील साहित्यिकांचा असल्याने, त्यांचे साहित्य सुसंस्कारीत परिवर्तनशील साहित्य आणि समाजाचा अनुबंध निर्माण करणारी आहे.हे त्यांच्या समग्र साहित्यातून दिसून येते. प्रस्तुत लेखातून संक्षिप्त रूपात यशवंतराव चव्हाण यांचा साहित्यविषयक दृष्टीकोन समजून घेण्यासाठी केलेला हा प्रयत्न आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या एका पैलूवरील विचार वाचकाच्या समोर ठेवले आहेत. यात आणखीन भर टाकता असती पण विषयमर्यादेमुळे ते टाकता आली नाही याची जाणीव आहे.



Scanned with CamScanner

## संदर्भसूची

1) भा. ल. भोळे, यशवंतराव चव्हाण राजकारण आणि साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.द्वितीय आवृत्ती, प्रस्तावना.
2) यशवंतराव चव्हाण, ऋणानुबंध १९७९, प्रेष्टीज प्रकाशन, पुणे.
3) डॉ. साहेब खंदारे, मराठ्यांचा सामाजिक सांस्कृतिक इतिहास (पहिला खंड ) आरंभपर्व राजमुद्रा प्रकाशन, प्र. आ.१मे २००८ पृ. ५६.



Scanned with CamScanner